महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०४ /२०२३ दि. ०६/०१/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत ठाणे शहर पोलीस दलातील **'पोलीस शिपाई भरती प्रक्रिया २०२१'** करीता उमेदवारांची १६०० मीटर धावणे मैदानी चाचणी दि. ०९/०१/२०२३ रोजीपासून बाळकुम पाईपलाईन येथे घेण्यात येणार आहे. उमेदवारांची मैदानी चाचणीतील १६०० मीटरची सुरूवात ही दादलानी रोड कडून येणारे पाईपलाईनकडून होवून रूस्तमजी येथील पाईपलाईन येथे समाप्त होणार आहे. सदर वेळी उमेदवार हे साकेतकडून बाळकुमकडे जाणारा मुख्य रस्ता ओलांडून जाणार आहेत. सदर रस्ता हा बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचे अखत्यारीत येत आहे. नमुद मार्गावरून आजूबाजूचे परिसरातील रहिवासी हे सदर मार्गाचा मॉर्निंग वॉकसाठी, पायी ये–जा करण्यासाठी वापर करीत असतात. सदर मार्ग हा पोलीस भरती मैदानी चाचणीचे अनुषंगाने पादचाऱ्यांकरीता बंद करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) साकेत बाळकुम मार्गावरील ग्लोबल हॉस्पिटल समोरील पाईपलाईन मार्गे उजवीकडे दादलानी रोड व डावीकडे रूस्तमजीकडे पाईपलाईन मार्गे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना ग्लोबल हॉस्पिटलसमोर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने ही बाळकुम साकेत मुख्य रोड मार्गे महालक्ष्मी मंदिर येथून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) बाळकुम साकेत मार्गावरील ग्लोबल हॉस्पिटल समोरील पाईपलाईन मार्गे डावीकडे दादलानी रोड व उजवीकडे रूस्तमजीकडे पाईपलाईन मार्गे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना ग्लोबल हॉस्पिटलसमोर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, मॉर्निंग वॉक करणारे आणि सर्वसामान्य नागरिक हे साकेत बाळकुम मुख्य रोडमार्गे डावीकडे लोढा निवासी संकुलकडे जाणाऱ्या मार्गे अथवा बाळकुम सिग्नल येथुन इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) बाळकुमकडून साकेतकडे जाणारे रोडकडे जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना लोढा निवासी संकुल येथून बाहेर पडणारे मार्गावर बाळकुम साकेत रोड येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही उजवीकडे वळण घेवून लोढा निवासी संकुलकडे जाणाऱ्या रस्त्यावरून पुढे माजिवडा मार्गे अथवा बाळकुम सिग्नल येथून कापूरबावडी सर्कल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) साकेतकडून बाळकुमकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना साकेत पुलाखाली महालक्ष्मी मंदिर येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारी सर्व प्रकारची वाहने ही साकेत पुलाखाली महालक्ष्मी मंदिराजवळ डावीकडे वळण घेवून साकेत पंक्चर मार्गे नाशिक–मुंबई महामार्गावरून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) रूस्तमजीसमोर पाईपलाईन मार्गे ग्लोबल हॉस्पिटलकडे जाणारे रोडकडे जाणारे पादचारी, मॉर्निंग वॉक करणारे आणि सर्वसामान्य नागरिक यांना रूस्तमजी अपटाऊन अर्बनिया बिल्डींगसमोर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, मॉर्निंग वॉक करणारे सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने ही माजिवडा सर्व्हीस रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) दादलानी रोडकडून पाईपलाईन मार्गे ग्लोबल हॉस्पिटलकडे जाणारे रोडकडे जाणारे पादचारी, मॉर्निंग वॉक करणारे आणि सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारच्या वाहनांना मल्टिकार वर्कशॉप, तरबेज इंटरप्रायजेस, दादलानी रोड समोरील पाईपलाईन मार्ग येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर मार्गावरून जाणारे पादचारी, सर्वसामान्य नागरिक तसेच सर्व प्रकारची वाहने ही दादलानी रोड, बाळकुम रोड मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. ०९/०१/२०२३ रोजीपासून **'पोलीस भरती प्रक्रिया २०२१'** मैदानी चाचणी संपेपर्यंत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>**

– जिल्हाधिकारी, ठाणे
– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत :–** समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग/पोनि कोपरी, नौपाडा, वागळे, राबोडी वाहतूक उप विभाग.